# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

दारिद्र्य निर्मूलन, भूक निर्मूलन आणि तरुणांना समान संधी उपलब्ध करून देण्याची धोरणे राबवून, भारत जगासमोर एक उज्ज्वल उदाहरण म्हणून उभा आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज राष्ट्रीय मानवाधिकार आयोगातर्फे आयोजित मानवाधिकार दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. मानवी हक्कासाठी अविरत काम करणाऱ्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगासह न्यायपालिका आणि प्रमुख भागधारकांची त्यांनी प्रशंसा केली. न्याय आणि मानवी प्रतिष्ठा हे समाजाचा पाया असून, अशा जगाच्या उभारणीसाठी योगदान देण्याच्या सामूहिक संकल्पालाही राष्ट्रपतींनी दुजोरा दिला.

मानवी हक्क दिनानिमित्त मुंबईत राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रम होत आहे.

****

विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या दगारोळानंतर संसदेच्या दोन्ही सदनाचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

लोकसभेत आज कामकाज सुरु झाल्यानंतर अध्यक्ष ओम बिरला यांनी कामकाजात सतत व्यत्यय येत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रत्येक सदस्याने सभागृहाची प्रतिष्ठ राखली पाहिजे आणि देशातल्या नागरीकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम केलं पाहिजे, असं बिरला यांनी सांगितलं. विरोधकांची वागणूक योग्य नसून, ती सदनाच्या नियमांविरुद्ध असल्याचं ते म्हणाले. या वक्तव्यावर काँग्रेससह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी आक्षेप घेत, सत्ताधारी पक्ष देखील कामकाज होऊ देत नसल्याचं नमूद केलं. यावरुन दोन्ही बाजुच्या घोषणाबाजीमुळे सदनाचं कामकाज आधी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेतही हेच चित्र पहायला मिळालं. विविध मुद्यांवरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

****

माजी परराष्ट्रमंत्री आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस एम कृष्णा यांचं आज पहाटे बंगळुरु इथं प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झालं, ते ९२ वर्षांचे होते. एस एम कृष्णा हे कर्नाटकचे दहावे मुख्यमंत्री होते. २००९ ते २०१२ या काळात ते परराष्ट्र मंत्री होते, तर २००४ ते २००८ या काळात महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी काम पाहिलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामैय्या यांच्यासह इतर नेत्यांनी एस एम कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

केंद्रीय पंचायत राज मंत्रालयाचे २०२२-२३ या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांचं वितरण उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. यात महाराष्ट्राला सहा पुरस्कार मिळाले आहेत. सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्रामपंचायत असे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा पुरस्कार जाहीर झाला आहे. नाशिक जिल्ह्यातली मोडाळे ग्रामपंचायत, भंडारा जिल्ह्यातली बेला ग्रामपंचायत, तसंच पुण्यातल्या यशदा, अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेला विविध श्रेणीत पुरस्कार जाहीर झाले आहेत.

****

मुंबईत कुर्ला परिसरात बेस्ट बसच्या भीषण अपघातातल्या मृतांची संख्या सहावर पोहचली आहे. तर, जखमींची संख्या ४२ झाली आहे. जखमींना उपचारासाठी विविध रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आंबेडकर नगर परिसरात काल रात्रीच्या सुमारास हा अपघात झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने

करण्यासाठी आदेश देण्यात आले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं आहे.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा मुख्य परिक्षा २०२४ चा निकाल जाहीर केला आहे. या परिक्षेत उत्तीर्ण झालेले उमेदवार आता मुलाखतीसाठी पात्र ठरले आहेत. आयोगाच्या संकेतस्थळावर उमेदवारांना हा निकाल पाहता येईल.

****

बीड जिल्ह्यात केज तालुक्यातल्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यात सहभागी प्रत्येकावर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येणार असून, नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केलं आहे.

****

रेल्वेच्या हैदराबाद विभागातल्या रोलिंग ब्लॉक मुळे काही रेल्वे गाड्या अंशत: रद्द करण्यात आल्या आहेत. आजपासून ते १६ तारखेपर्यंत मनमाड – धर्माबाद मराठवाडा एक्स्प्रेस नांदेड ते धर्माबाद दरम्यान, तर दौंड – निझामाबाद डेमू गाडी मुदखेड ते निझामाबाद दरम्यान अंशत: रद्द करण्यात आली आहे.

****

मुंबईसह राज्यात पुन्हा थंडीची लाट आली आहे. आज धुळे शहरात यंदाचं निचांकी चार अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

****